CBSE School Approval

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

Registrar
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** – या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

**१.२.अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे, अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना
i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,
ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,



REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

Regarding Grant of permission to Maharashtra self Financing School ( Establishment & regulation) starting of new school on self financing basis under rule 2012, & Quality improvement of existing school for academic year 2014-15

**Government of Maharashtra**

Department of School Education & Sports

Government Resolution No. : SFS-1114/ Letter No.40/ SM-2

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralay, Mumbai-400032

Date: 26th Feb, 2014

**Read:**

1) Govt. Resolution, Dept of School Education & Sports – No. NOC-2009/(663/09)/Mashi-1, Date-20th Jun,2012.
2) Letter no. AMASHA/Self Financing/2013/60454/15-C(5)/12019, Date-24 December, 2013 of Director of education (Secondary & Higher Secondary), Govt of Maharashtra, Pune.

**Introduction:**

The Maharashtra Self Financing School ( Establishment & regulation ) Rule 2012 (No 01 of year 2013) act has been passed & implemented from academic year 2013-14. Under this act applications are invited for granting permission as per norms for establishment of new schools on self financing basis, & granting permission for quality improvement of existing Primary or Secondary or Higher Secondary Schools, starting such new schools, quality improvement in such existing schools. as per the Govt. resolution, dated 20 June, 2012, the detailed procedure for granting permission and issuing NOC for affiliation of existing & willing English medium schools to CBSE, ICSE, CB, IGCSE & CIE & other Educational boards on permanent non grant basis has been finalized.

Applications were invited for granting permission to self financing private new schools for academic year 2014-15 & quality improvement in existing schools till 08th August, 2013. Due scrutiny of these applications, & taking further action on the eligible

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

TRUE COPY

proposals was under due consideration of the Govt. After considering all issues the Govt. has taken decision as follows.

**Government Resolution-**

1. As per the Maharashtra Self Financing School ( Establishment & regulation ) Rule 2012 (No 01 of year 2013), for academic year 2014-15 in all 3700 proposals were received, out of which as given below the Government is hereby giving approval to the following 2217 proposals.

| Sr. no. | Classification | Eligible Proposal | Not Eligible Proposal | Total proposal |
|---|---|---|---|---|
| 1 | Proposal for permission of new schools | 1804 | 1325 | 3129 |
| 2 | Proposal for quality improvement of schools | 413 | 158 | 571 |
| | **Total** | **2217** | **1483** | **3700** |

**1.1 Permission for new schools and upgradation:**

The Govt. is hereby giving permission for establishment of new schools and upgradation of existing schools from academic year 2014-15, as per the schools mentioned in annexure A attached.

**1.2 Not eligible schools:** The proposals considered non-eligible for starting new schools and upgradation of existing, schools along with the details for rejection of the proposals will be informed to the individually institutes who had submitted these proposals, by the Member Secretary of the scrutiny committee of the concerned district.

**2. Terms & Condition for Govt. permission / upgradation of schools.**

2.1 It is compulsory for the pre primary & primary schools to fulfill all the rules / regulations of free & compulsory education under the Right to Education rule, 2009.

2.2 Permission is hereby given to the management of the concerned schools, whose proposals are eligible to start school in academic year 2014-15, on the condition of fulfillment of terms of RTE rule, 2009.

A) Those managements that have fulfilled all requirements as per norms of Govt. for starting new schools or upgrading existing schools, such managements should apply for First Approval to the concerned district education officer within one month of start of the academic year.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

B) Those proposals of management which have been considered eligible for year 2014-15 by this Govt., but if such management do not have all requirements as per Govt. norms for starting of new schools or upgrading existing schools then they should fulfill all such requirement for starting of new schools as per Govt. norms within 18[th] month of the issue of the Govt. approval or otherwise this approval will automatically be cancelled.

C) Those institutes / schools who wish to be affiliated to CBSE, ICSE, IB, IGCSE & CIE & other educational boards & such institutes that have been considered eligible by the Govt. and given permission, as per the conditions laid in Govt. resolution dated 20[th] June 2012, should take recognition of the school before applying for NOC the schools are given recognition as per Govt. resolution, and sub clause (10) by District Education Officer (Per-Primary), District Education Officer (Primary) / Education Inspector, Mumbai, the school should apply to the Govt. for obtaining NOC for getting affiliation of the Concerned Education boards.

**2.3** It is binding on all newly permitted school/ upgraded school listed in the attached annexure to

i) Follow all orders and procedures laid down by Govt. from time to time

ii) Follow all regulations of Maharashtra self financing school (Establishment & regulation) Rules, 2012 (no. 01 of year 2013)

**2.4** It will be the responsibility of all the concerned Deputy Directors of education to give information regarding this order to all managements/ school within 15days.

**2.5** The concerned authorised officer should confirm that the school has fulfilled all the norms under rule 2009 and thereafter proceed for issue of the first approval.

**2.6** In future, the management of the school that had applied for permission for starting a school in a specific medium, specific place, etc cannot make any changes in the same. If the school is started in any other place not permitted by the Govt. the permission given by the Govt. will be understood to have been cancelled automatically.

**2.7** U-DISE data- it will be the responsibility of the management, that has been permitted by this Govt. to start new school or upgrade school that while filling the in U-DISE ( Unified District information System for Education), they should receive registration number after registration independent class as "School Permitted on self financing basic".

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara

In this regard for future actions the State Project Director, Maharashtra primary education department, Mumbai is declared to be appointed as Nodal Officer. And also for the information of all concerned, it is compulsory that the should display prominently a display board outside the entrance of the school, mentioning that "new school permitted on Self financing basis / school permitted for upgradation"

This Govt. resolution is made available on the website of Government of Maharashtra (www.maharashtra.gov.in) and its website number is 201402281124019921. This order issue with digital signature.

In the name and order of Governor of Maharashtra.

Ramchandra Ganpat Gunjal
(R.G.Gunjal)
Principal Secretary, Govt. of Maharashtra

**Copy to,**

1. Commissioner, School Education, Maharashtra State, Pune.
2. Commissioner of all Municipal Corporations.
3. Chief Administrative Officers of all Zilla Parishads.
4. Chief Director, Information & Public Relations Directorate, Mantralay, Mumbai.
5. State project Director, Maharashtra Primary Education Department, Mumbai.
6. Director of Education, (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune.
7. Director of Education,(Primary), Maharashtra State, Pune.
8. All Divisional Directors.
9. All Divisional Deputy Directors.
10. Education Officers of all Zilla Parishads( Primary & Secondary)
11. All Education Inspectors (West, North, South) Bruhan Mumbai.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

12. Concerned Administrative officer , Muncipality/Nagar Parishad/Nagar Palika.

**Copy forwarded for information to:-**

1. Personal Secretary of Hon. Minister (School Education).
2. Personal Secretary of State Minister (School Education)
3. Personal Assistant of Hon. Primary Secretary (School Education)
4. All Associate Secretary /Deputy Secretary, School Education & Sports Department.
5. Non Selected (S.M.-2)

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

हतीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२
वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

जा.क्र.उमा/२/कोवि/स्वअप्रमा/११वी/क्र. 27695-97

दिनांक - 2 NOV 2016

प्रति,

शासन निर्णय अनु. क्रमांक २१८१

प्राचार्य/ मुख्याध्यापक
यशोदा ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, यशोदा टेक्निकल
केंप वाढेफाटा, नॅशनल हायवे ४ , सातारा

विषय- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात उच्च माध्यमिकच्या शाखा/वर्ग/तुकडयांना नूतनीकरणाने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्याबाबत जून २०१५

संदर्भ -१. शासन निर्णय क्र. स्वंयअ-२०१३/(८५/१३)/माशि-१, दि. २६/२/२०१४
२ या कार्यालयाचे उच्च माध्य. शाळा परवानगी आदेश दि. २५/०४/२०१५
३. शासन पत्र क्र. एचएससी१७००/(३९०१/००)/उमाशि-१, दि.२९/९/२०००
४. शिक्षणाधिकारी (माध्य) सातारा यांचेकडून प्राप्त अहवाल दि. १८/१०/२०१

शासनाच्या वरील संदर्भिय आदेश क्र. १ नुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस नवीन /दर्जावाढीने इ. ११ वी चे शाखा/वर्गांना आपणांकडून पाठविणेत आलेल्या प्रस्तावास अनुसरुन 'स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा ' म्हणून परवानगी देणेत आलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र. २ नुसार परवानगी कळविणेत आलेली आहे.

सदर संदर्भ क्र. १ व २ नुसार या कार्यालयास प्राप्त संदर्भ क्र. ४ चे अहवालास अनुसरुन आपल्या उच्च माध्यमिकचे खाली नमूद केलेल्या वर्गास या कार्यालयास प्राप्त अधिकारान्वये खालील अटी व शर्ती नुसार जून २०१५ पासून 'नूतनीकरणाने' प्रथम मान्यता देणेत येत आहे. सदर उच्च माध्यमिक वर्गांची मान्यता महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियमातील तरतूदी व संदर्भ क्र. २ चे परवानगी आदेशातील व संदर्भ क्र.३ चे शासन निर्णयातील अटी/शर्ती, तसेच वेळोवेळी सुधारीत होणारे शासन निर्णय/नियम यांचे सतत पालन करणेचे अटीस अधीन राहून देणेत येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव व पत्ता | इयत्ता | माध्यम/प्रकार | मान्यता दिलेली शाखा/वर्ग/तुकडी | | | | परीक्षा मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | |
| १. | यशोदा ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, यशोदा टेक्निकल केंप वाढेफाटा, नॅशनल हायवे ४ , सातारा | ११वी | इंग्रजी नवीन शाळा | ०० | प्रथम-१ | ०० | ०० | राज्य मंडळ |

१. संस्था सदर शाळा स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर मान्य झालेली असून अधिनियमातील तरतुदी व्यवस्थापनावर बंधनकारक असतील. तसेच सदर शाळा अधिनियमातील तरतूदीनुसार सदर शाळा चालविली जाईल. तसेच सदर शाळेसाठी कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वतः करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांचेकडून कोणतेही सहाय्यक अनुदान किंवा वित्तीय सहाय्य देणेत येणार नाही. आणि अशा शाळेच्या व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३. शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे. तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेतली पाहिजे. तसेच सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने बँकेमार्फत दिले पाहिजे.

४. संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

५. संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मूल्यमापन पध्दती शालेय व सहशालेय/ कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६. संस्थेने शाळेतील विदयार्थ्यांसाठी/ कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवहया अदयावत व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

७. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

८. संस्थेस परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त सदरचे वर्ग सुरु केल्यास शासनाने व या कार्यालयाने दिलेली मान्यता आपोआपच रद्द समजणेत येईल.

९. शाळेने माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ मधील तरतूदी तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतूदी तसेच अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांची परिपूर्ती करण्यास कसूर केली असेल अशा शाळांची मान्यता काढण्याबाबत कार्यवाही करणेत येईल..

१०. संस्थेने/शाळेने माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील तरतूदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

११. संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त उच्च.माध्यमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

१२. संस्थेने वर्गातील विद्यार्थी संख्या, विद्यार्थी प्रवेश, शैक्षणिक फी इ. बाबतच्या शासनाच्या प्रचलित आदेशांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. मंजूर केलेल्या वर्गात विहित क्षमतेपेक्षा ज्यादा विद्यार्थ्यांना पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश देता येणार नाही.

१३. नैसर्गिक वाढीच्या वर्गांना या कार्यालयाकडून मंजूरी घेणेत यावी.

१४. शाळेमध्ये मुलां/मुलींसाठी सुव्यवस्थित स्वतंत्र स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करावी.

१५. नवीन /दर्जावाढ शाळांमध्ये शासन निर्णय दि. २९/६/२०१३ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. तसेच आरटीई ॲक्ट २००९ मध्ये नमूद केलेल्या व केल्या जाणाऱ्या सर्व नियमांची/तरतूदींची व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

**१६. शासन निर्णय दि. ३/११/२००९ नुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड नुसार असणे आवश्यक आहे.**

१७. सदर उच्च माध्यमिक वर्गांना मान्यता ही मान्यता वर्षापासून प्रत्यक्ष सुरु असतील तरच चालू . सदर वर्ग बंद पडल्यास ते पुन्हा सुरु करता येणार नाहीत.

१८. अधिनियमातील कलम १३ नुसार शिक्षण संचालक व राज्य शासन यांना किमान १८ महिने कालावधीची पूर्वसूचना दिल्याशिवाय सदर शाळा/वर्ग बंद करता येणार नाहीत. पूर्वसूचनेशिवाय शाळा बंद केल्यास सचिव, व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व्यक्ती कसूरदार ठरली तर अपराध सिध्द झाल्यावर तिला ५ लाखापेक्षा कमी नाही अशा दंडाची शिक्षा करणेत येईल.

१९. अधिनियमातील कलम ४ नुसार व अनुसूची ग मध्ये विनिर्दिष्ट केलेली दाननिधीची प्रतिभूती ठेव व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी (माध्य) यांच्या संयुक्त नावे ठेवणेत येईल व अशी ठेव/ प्रतिभूती/ प्रमाणपत्र शिक्षणाधिकारी (माध्य) यांचेकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल. असे ठेव/ प्रतिभूती/प्रमाणपत्र पुढील नवीनकरणाच्या अटीच्या अधीनतेने, किमान ३ वर्षांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल.

**२०. सदर शाळा शासन निर्णय दिनांकापासून १८ महिन्यात सुरु केलेने नूतनीकरणाने मान्यता देणेत आली आहे**

वरील अटींची/शर्तीची व प्रचलित नियमांची कुठलीही अट पालन करण्यास संस्थेने/ शाळेने असमर्थता दर्शविल्यास सदर शाळेची/वर्गाची मान्यता रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(एम. के. गोंधळी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर

प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा
वरील क्र.१९ नुसार दाननिधीची मूळ ठेव पावती आपले दप्तरी ठेवणेत यावी.
प्रत-अध्यक्ष/सचिव, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, यशोदानगर, ता.जि. सातारा

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती/सूचना/आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| २१७५ | सांगली | सिध्दनाथ शिक्षण संस्था दिघंची ता. आटपाडी | कै. स्वातंत्र्य सैनिक गणपतराव मोरे ज्यु. कॉलेज सायन्स दिघंची ता. आटपाडी | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१७६ | सांगली | श्री. भवानी एज्यु. सोसायटी आटपाडी | राजाराम बापु हायस्कूल आटपाडी | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१७७ | सांगली | विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ यशवंतनगर चिखली | कमलामाधव विद्यालय गुढे ता. शिराळा | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१७८ | सांगली | नानासाहेब सगरे चॅरीटेबल संस्था राजारामबापु नगर कवठेमहांकाळ | महांकाली विद्यानिकेतन व ज्यु. कॉलेज कवठेमहांकाळ | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१७९ | सांगली | विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ यशवंतनगर चिखली | महाराष्ट्र हायस्कूल रिळे, ता शिराळा | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१८० | सांगली | जत तालुका शिक्षण प्रसारक मंडळ जत | छत्रपती शिवाजी हायस्कूल उमदी ता. जत | दर्जावाढ | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१८१ | सांगली | व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था पेठ नाका | भागीरथी रामचंद्र महाडिक ज्युनि कॉलेज, कालेवाडी | नवीन शाळा | उच्च माध्य. | मराठी | पात्र |
| २१८२ | सातारा | श्री. संत कृपा शिक्षण संस्था घोगाव | श्री. संत कृपा इंटरनॅशनल ज्युनि. कॉलेज घोगाव | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१८३ | सातारा | यशोदीप महिला विकास कराड | कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय मल्हारपेठ पाटण | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| २१८४ | सातारा | पोतदार एज्युकेशन ॲण्ड ट्रस्ट मुंबई 412 | पोतदार इंटरनॅशनल स्कूल जामआई नगर सातारा | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१८५ | सातारा | मातोश्री प्रतिष्ठान मलकापूर | गुरुकुल हायर सेकंडरी स्कूल घोगाव | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| २१८६ | सातारा | श्री भराडीमाता चॅरिटेबल ट्रस्ट धामणी ता.पाटण | गुरुकुल उच्च माध्यमिक विद्यालय धामणी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| २१८७ | सातारा | स्वराज एज्यूकेशन सोसायटी साईदीप विनायक कॉलनी आगाशिव नगर कराड | यशश्री कोराल ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स वनवासमाची पो. वडगाव | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१८८ | सातारा | ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था प्लॉट नं. 42 सिडको कॉलनी सेक्टर 2 ऐरवली मुंबई | निळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिकविद्यालय पळोशी निळेश्वर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| २१८९ | सातारा | यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ यशोदानगर | यशोदा ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स, यशोदा टेक्निकल कॅंप वाढेफाटा नॅशनल हायवे 4 सातारा | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| २१९० | सातारा | कोयना एज्युकेशन सोसायटी तळदेव ता. महाबळेश्वर | क्रांती विद्यालय साखळी | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |

Principal
Yashoda Public School
Satara.

Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२

वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

---

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा- परवानगी आदेश** जा.क्र.प्राथ/माध्य/कोवि/स्वंअशा/पर/१६-१७/14582-16276

शासन निर्णय अनु. क्रमांक १६५० दिनांक - 14 JUL 2016

प्रति,

अध्यक्ष/सचिव

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ सातारायशोबल यशोदानगर गोडोली हायवे लगत सातारा ता जि सातारा

विषय :- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत- प्राथमिक/माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा

संदर्भ :१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (म.शासन असाधारण४,६ व२४) २) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएसएस १०१६/प्रक्र.९९/एसएस-२, दिनांक १७/६/२०१६

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता प्रस्ताव सादर केला होता. त्याप्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देण्यात येत

शाळेचा प्रकार **उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी)**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/दर्जावाढ | मंडळ संलग्नता | परवानगी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ सातारायशोबल यशोदानगर गोडोली हायवे लगत सातारा ता जि सातारा | यशोदा पब्लिक स्कूल सातारायशोदा टेक्निकल कॅम्पस वाढे फाटा NH 4 लगत सातारा | इंग्रजी | दर्जावाढ | सी.बी.एस.ई. | २०१६-२०१७ |

1) संस्थेस शाळा परवानगी साठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून असेल.

4) शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे, त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग सुरु करता येणार नाहीत.

5) परवानगी मिळाल्यापासून 18 महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

6) परवानगी देण्यात आलेल्या नवीन/दर्जावाढ शाळा यांना केंद्र व राज्य शासनाचे शिक्षण विषयक अधिनियम, नियम, वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

7) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

8) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू-डायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून कोड प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

10) नवीन/दर्जावाढ शाळामध्ये शासन निर्णय दि. 29/6/2013 नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. या शाळांच्या संदर्भात आर.टी.ई. ॲक्ट 2009 मध्ये नमूद केलेल्या सर्व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

11) शाळेमध्ये आकारण्यात येणारे शैक्षणिक शुल्क प्रचलित नियम तसेच वेळोवेळी होणा-या सुधारीत नियमानुसार आकारण्यात यावे. तथापि, ठरवून शैक्षणिक शुल्क आकारणी करु नये. नियमबाह्य शुल्क आकारणी केल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

हतीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२

वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

12) अधिनियमातील तरतुदीनुसार संस्था करीत वर्ग कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास कायमपणे आर्थिकदृष्ट्या सक्षम असली पाहिजे. या वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी दिली असल्याने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

13) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

14) शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे. तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेतली पाहिजे. तसेच सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहिजे.

15) संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे तसेच शासन निर्णय दि. 29/6/2013 मध्ये दिलेल्या मूलभूत सुविधांच्या निकषांची पुर्तता असणे आवश्यक आहे.

16) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

17) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी /कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहीजेत.

18) संस्थेने /शाळेने आर.टी.ई. ॲक्ट 2009 , माध्यमिक शाळा संहिता, म.रा.खा.शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली 1981 मधील तरतुदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

19) शासन निर्णय दि. 3/11/2009 नुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डिंग कोडनुसार असणे आवश्यक आहे.

20) सदर शाळेस सक्षम प्राधिकाऱ्याकडून (शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक, शिक्षण उपसंचालक) यांचेकडून प्रथम मान्यता प्राप्त झालेनंतर शाळेने ज्या अभ्यासक्रम मंडळाशी संलग्न होण्यासाठी या अधिनियमातंर्गत परवानगी मागणी केलेली असेल त्या अभ्यासक्रम मंडळ संलग्नतेसाठी प्रचलित नियमानुसार विहित नमुन्यात व कार्यपध्दतीनुसार शिक्षण उपसंचालक यांचेकडे अर्ज करेल. सीबीएसई, आयसीएसई इ. शिक्षण मंडळाशी संलग्न होवू इच्छिणाऱ्या शाळांना शासन निर्णय दि. 20/6/2012 नुसार विहित नमुन्यात नाहरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करावा लागेल.

**21) संस्थेने दाननिधी संस्था व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचे संयुक्त नावे ठेवावा. प्रथम मान्यता प्रस्ताव सादर करताना दाननिधीची मुद्‌त ठेव पावती शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे जमा करावी. शिक्षणाधिकारी यांनी सदरची मुद्‌त ठेव पावती जतन करुन ठेवावी व आवश्यकतेनुसार संबंधिताकडुन ठेव पावतीचे नूतनीकरण करुन घेण्यात यावे. सदर दाननिधी पावती राष्ट्रीयकृत बँकेमध्ये किमान 3 वर्ष मुदतीची ठेव पावती असणे आवश्यक आहे.**

22) महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना सदर नियमांतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतूदींची तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व माध्यमिक शाळा संहिता मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा प्रथम मान्यतेकरीता प्रस्ताव 1 महिन्याच्या आत विहित नमुन्यात सक्षम अधिकाऱ्याकडे (प्राथमिक शाळेबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेबाबत शिक्षण उपसंचालक) सादर करणे आवश्यक राहील. मुदतीत प्राप्त न झालेल्या प्रस्तावांना मान्यता नाकारण्यात येईल. व यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी खालपावर राहणार नाही.

( एम. के. गोंधळी )
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32
मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक/प्राथमिक) शिक्षण संचालनालय, म.रा पुणे
संबंधित संस्था अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक यांना माहिती व कार्यवाहीसाठी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद सातारा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
सदर शाळा संबंधित संस्थेने सुरु केल्यानंतर 1 महिन्याच्या तपासणी करुन त्याचा तपासणी अहवाल अनुसरुन प्रथम मान्यतेबाबतची कार्यवाही तेथूनच यावी. माध्यमिक व उच्च माध्यमिकचे प्रस्ताव या कार्यालयास प्रथम मान्यतेसाठी सादर करावेत

REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १८४४ | सातारा | ज्ञानसंवर्धिनी एज्युकेशन सोसायटी शिरवळ मु.पो.शिरवळ ता.खंडाळा जि.सातारा 412801 | ज्ञानसंवर्धिनी इंग्लिश मिडीयम स्कूल शिरवळ मु.पो.शिरवळ ता.खंडाळा जि.सातारा पिन ४१२८०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १८४५ | सातारा | कृषी विकास प्रतिष्ठान देवापूर मु.पो. म्हसवड ता.माण, जि. सातारा पिन ४१५५०९ | क्रांतिवीर इंग्लिश मेडीयम स्कूल म्हसवड अ/प म्हसवड ता माण, जी. सातारा पिन ४१५५०९ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| १८४६ | सातारा | उमराव माने चॅरिटेबल ट्रस्ट लिमिटेड ४६० डी सोमवार पेठ पंताचागोट कराड ता कराड जि सातारा | ब्रिलियन्ट इंग्लिश मिडीयम स्कूल वारुंजी कराड पाटण रोड वारुंजी मु पो वारुंजी ता कराड जि सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८४७ | सातारा | श्री गुरु देवदत्त फौंडेशन नवीन पत्ता - द्वारा रोडगे जगन्नाथ खंडू ,ओम विहार - अ -५,सुखसागर नगर ,कात्रज पुणे ४६ अपो. अंबामाता मंदिर जुना पत्ता -सी -८६/११ सुपर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे ३७ | न्यू इंग्लंड इंग्लिश मिडीयम स्कूल मु पो -लोणंद ,ता -खंडाळा जि - सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८४८ | सातारा | मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ मायणी मु. पो. मायणी ता. खटाव जि. सातारा पिन - ४१५१०२ | भारतमाता इंग्लिश मीडियम स्कूल मायणी मु. पो. मायणी ता. खटाव जि. सातारा पिन - ४१५ १०२ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८४९ | सातारा | श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी कराड बोर्ड फॉर हायर एज्युकेशनल्स कराड मु पो विद्यानगर , कराड , ता . कराड , जि : सातारा | वेणूताई इंग्लिश मिडीयम स्कूल मु पो विद्यानगर , बनवडी कराड , ता . कराड , जि : सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८५० | सातारा | यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ सातारा यशोबन यशोदानगर सोडोशी हायवे नगर सातारा ता जि सातारा | यशोदा पब्लिक स्कूल सातारा यशोदा टेक्निकल कॅम्पस वाढे फाटा एन एच ४ नगर सातारा | दर्जावाढ | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८५१ | सातारा | गंगाई एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर सोसायटी सिद्धार्थ नगर पाचगणी ता महाबळेश्वर जि सातारा | ज्ञानगंगा हायस्कूल मु पो सिद्धार्थ नगर पाचगणी ता महाबळेश्वर जि सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८५२ | सातारा | श्री सद्गुरु प्रतिष्ठान फलटण जिजाई लक्ष्मीनगर फलटण मु. पो. तालुका. फलटण, जिल्हा - सातारा. | ब्रिलियन्ट अॅकेडमी इंग्लिश मेडियम स्कूल स्वामी विवेकानंद नगर फलटण , ता- फलटण , जि सातारा , पिन ४१५५२३ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १८५३ | सातारा | भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी आदर्की बु मु पो आदर्की बु ता फलटण जि सातारा महाराष्ट्र ४१५५३६ | एम्बिशन इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मु पो आदर्की बु ता फलटण जि सातारा महाराष्ट्र ४१५५३६ | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी ते १२ वी) | इंग्रजी |
| १८५४ | सातारा | स्टार ग्रुप क्लब जाधव मळा, धोंडे रोड , उंब्रज तालुका -कराड जि -सातारा पिन - ४१५१०९ | ग्लोबल इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज उंब्रज जाधव मळा, धोंडे रोड , उंब्रज तालुका - कराड जि - सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी ते १२ वी) | इंग्रजी |
| १८५५ | सातारा | जनकल्याण प्रतिष्ठान कराड १,सोमवार पेठ,कराड,तालुका कराड,जिल्हा सातारा,४१५११० | सरस्वती विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय वाखाण रोड कराड तालुका कराड जिल्हा सातारा ४१५११० | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी ते १२ वी) | मराठी |
| १८५६ | सातारा | हाजी हाशमभाई एज्युकेशन ट्रस्ट सातारा ३७ अ राजसपुरा पेठ सातारा | इका इंग्लिश मेडियम स्कूल सातारा १६१ प्रतापगंज पेठ सातारा | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी ते १२ वी) | इंग्रजी |



REGISTRAR
Yashoda Shikshan Prasarak Mandal
Satara.

Principal
Yashoda Public School
Satara.

## शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२
वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा- परवानगी आदेश**

जा.क्र.प्राथ२/कोवि/स्वंअशा/पर/१४-१५/ 13647-753

शासन निर्णय अनु. क्रमांक ४६६

दिनांक -

प्रति,

अध्यक्ष/सचिव

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ,सातारा

विषय :- सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्या बाबत.

संदर्भ 1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (म. शासन असाधारण. 4,6 व 24)

2) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक एसएफएस-1114/प्र.क्र.40/एसएम-2 दिनांक 26 फेब्रुवारी 2014.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2014-2015 मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विदयमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. 02 च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नविन शाळा/दर्जावाढ | शाळा प्रकार | परवानगी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ,सातारा | यशोदा पब्लिक स्कूल सातारा वाढेफाटा सातारा | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | २०१४ - २०१५ |

1) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2014-2015 पासून असेल.

4)शैक्षणिक वर्ष 2014-2015 मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

5) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी व्यपगत होईल.

